तुळसी परब

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३५७



REFBK-0022362
REFBK-0022362

# ध्वादान्त आणि सुप्रमेय्य मधल्या मधल्यामधल्या कविता

# धादान्त आणि सुप्रमेय मधल्या मधल्यामधल्या कविता

तुळसी
परब

REFBK-0022362
REFBK-0022362

# धादान्त आणि सुप्रमेय्य मधल्या मधल्यामधल्या कविता

प्रकाशक : मुद्रक /
अनिल सावंत,
'साग्र प्रकाशन'
१६, साफल्य, करी रोड, मुंबई ४०० ०१२.

मुद्रण स्थळ /
आल्प्स प्रिन्टींग प्रेस,
२०२, अलंकार इन्डस्ट्रिअल इस्टेट,
आरे रोड, गोरेगांव (पू), मुं. ४०० ०६३.

© तुळसी परब

प्रथमावृत्ती :
१३ एप्रिल १९७७

मूल्य / तीन रुपये

मुखपृष्ठ : मांडणी /
प्रकाश विश्वासराव

# धादान्त आणि
# सुप्रमेय्य मधल्या
# मधल्यामधल्या
# कविता

तुळसी
परब

‘ धादान्त आणि सुप्रमेय्य ’ मधल्या काही कविता या काव्यसंग्रहात समाविष्ट केलेल्या आहेत. त्यामुळे कवितांचे अनुक्रमांक मात्र मूळ हस्तलिखिताप्रमाणे ठेवले आहेत.

# धादान्त

१

या त्रोटक रात्रीत
मी
सावली एके सावली
सावली दुणे एकान्त
सावली त्रिक आनंद
सावली आणि मी
सावली,
विलक्षणसाहसमहानंदवाली

२२३६२
काव्य
२३५५
(स्थळ प्रत)

तो डोळा होता आकाशातून सांडलेला विमनस्क
त्याला नव्हतं मधलं काळं केंद्र
त्याला नव्हत्या पापण्या
त्यात पडायच्या ढगांच्या समतोल सावल्या.
गाण्यांची आळीमिळी गुपचिळी
आम्ही हसायचो तो खिदळायचा,
तो होता पाचवीला पुजलेला कायमच आमच्या

तो डोळा हालत्या पाण्यासारखा
हालत्या पाण्याचं गूढ अवगुंठन पांघरून
जेलासारखा होता तो कायमच अवघडून

प्रत्येक कैदी त्याला बघायचा आडून आडून
आणि हासडायचा शिव्या दैववशात.

नालीतून पिवळट रोगट पाणी वहाते
रेडिओ कळवळून सांगतो
प्रगतीला आहेत सर्व निर्वेध दिशा.
मोगरा कळ्या फुलारतो
शुभ्रता हुंकारतो अनपेक्षित
रात्र पुढारते निस्तरंग गाण्यात.
कुणी झोपतो आठवणीत
कुणी खेळतो पाण्यात उलथापालथीत
पिसलेले पत्ते पडून निर्व्याज आळसात.
पोलीस कंटाळतो उभ्याउभ्याने
बघतो दूरचे लालनिळे स्त्रैण ठिबके.
आणि
निस्तब्ध रहात सर्वांशी खेळीमेळीने
निस्तब्ध कुजते सर्वांच्या खेळीमेळीत.

१३

मी शिवतो अंगावरचं फाटकं वस्त्र
नि सुईच्या नेढयातून मला दिसते तुझी मांडी
माझी साधी महत्त्वाकांक्षा
तुझं संलग्न वैभव
तुझ्या हासण्यातून सांडलेली
कोमल किरणं, आसपास
एक निरंतरचा विश्वास
असलेला भरून नेढयातला अवकाश,
तटस्थपणे कसं पाहू हे लाडकं
स्वप्न.
कसा विसावा मागायचा आता
क्षणभर जेव्हा सूर्यास्ताचा क्षण,
आणि अंधाराचे आत पडताना
थंड पाऊल
तुझी गोरी पावलं
तुझं सालंकृत सर्वस्व
व किती निरक्षर मी
किती असहाय्य
मी सांधायला लागतो
तुझी देहस्वीन् नवता, आवाहन
आणि स्वप्नासारखे कोसळून
पडते माझे उत्तुंग गाणे
पावसासारखी, पाण्यासारखी, किरणांसारखी
कल्पान्तासारखी केवढयातरी दूरच्या

ये या दुर्दैवी मिठीत
दे तुझे आमरण अंतर्गुह्य
हो माझी
हो माझी साहजिक शक्ती
माझा शेवटचा उपाय.

पडत धडपडत हेकेखोर वेड्यासारखा
मी ओरबाडून काढतो कैदी कपडे
आणि चढवतो समोरच्या पुतळयाला ते :
माझ्या सगळया सांवत्सरीक चिंध्या
याला ढकलून दिला पाहिजे
तिथे माझी स्थापना केली पाहिजे
पण याचे ब्रॉंझ चमकते देवमाशासारखे
आणि याचे शरीर लखलखते क्रूर मोरासारखे
हा दैवी वेडझवा हा जगन्मान्य आपोलो
याचं इंद्रिय म्हणजे होता चांदण्यांचा पुंजका
आणि त्याला जडवलेला वेडाचा आंधळा चंद्र,
आणि त्याची सामुद्रिक गती सगळी अवरोधलेली
कुठल्या पुष्पक, कुठल्या हेलिकॉप्टरने याला टाकला
या दुष्ट दुनियेत दीर्घ किंकाळयांच्या
सुप्त शोकाने बरबटलेल्या रात्रींच्या
एकान्ताने वेढलेल्या आपमतलबाच्या
कसा एवढा प्रदीर्घ अवकाश हा झेपावतो आता
बाहू घनघोर, अवाढव्य उभारून
कसा हा उपद्व्याप करतो सगळ्या
जेलाला मोठा संदेश देत असल्यासारखा

अरे मूर्ख तोतया, तुझी ही भूमिका झालीय मर्त्य,
तुझ्याही इंद्रियांवर माशा बसतात घोंगावत
नि तुझे मोडकळीला आलेले सगळे स्वरूप
लोकांनी हात लावून लावून चाचपून पाहिलेले.

फेड हे अघोरी दुखणे, ये माझ्यासारखा

या सळ्यांच्या आत

खा कोंड्याची रोटी, मातट पाणी आणि
घे ईश्वरी स्वराज्याचे प्रत्येक सकाळी नाव.

अरे दैवी आपोलो, आपला म्हणताही येत नाही तुला

म्हणून मी झाकतो सगळ्या चिंध्यांनी तुला

आणि माझ्या शापाचा डोळा वटारून ठेवतो तृप्त तुझ्यावर

१९७६ आणि जखमांची वेळ कसली गुन्ह्यांवर
लटकावलेली जन्मठेपेची सजा फाशीची सजा किंवा
रिगरस इम्प्रीसनमेंट आणि संपलेला नाही कधीच
रजा सगळं आयुष्य डोळ्यांत उतरतं सगळं
भडक होऊन उन्हाच्या भप्प छाप्यासारखं
उद्या कवी उगवणार आहे
लहानथोर पण सगळे चोर नुसते दहापाच बाटलीवाल्याला
आत करून द्यायचे नि नागव्या बायांचे क्लब्ज
तसेच चालू ठेवायचे त्यांच्या कुल्लयावरचे भक्कम
गॉगल्स मंत्र्यासंत्र्यांना घेतात खेचून बळकावतात
त्यांचे ओठ, इंद्रियनिष्ठा नि झोपदार पाळीव शरीरं
धावत रांडांच्यामागे सगळे सांड आणि गिरबिटतात
सगळे वार्तापत्रीत रकाने स्वतःच्या
हिजडेगिरीनी बघा, यांना वश कायमच
राज्ययंत्र यांनी भडकावलेली अन्नधान्याची
महागाई आणि कुबेरकुटुंबात यांनी जन्म घेतला
होता. म्हणून यांनाच लखलाभ सारे प्रचंड एकदा
म्हणले हे की खलास मग मृत्यूचा दरवाजा हे
उघडू शकतात कुणाहीसाठी कुठेही कधीही बांधला
जातो तुरुंग गॅसचेंबरच्या आकाराने वेढलेल्या थडग्यागत
आणि कळाहीनता केवढी नैराश्यपूर्ण गोष्ट आहे
महानगराचं सौंदर्य खरोखरच ह्या विरोधाभासानेच
आणि मी लाडक्या व्यवस्थेचं प्रेत काढू शकेन
या बराकच्या बाहेर

कारण आता ते कुजून त्याचा वास घुमायचा शिल्लक राह्यलाय
पण प्रेसरिपोर्टर्स सगळे गातायेत गोडवे विकासाची
परिक्रमा पूर्ण अगदी परिपूर्ण झालीय आपणच
एकमेव मनुष्यमात्रातले होनहार काही दुःख नाही
कोणी मरणारही नाही यापुढे सगळे अमर आहेत
किती गुलजार आणि हृदयभेदी घोषणा किती खुलून
दिसेल ही अमर कवितेतसुद्धा
खरोखरच खुलून दिसेल कारण बाहेरची वस्ती;
माहीम लेबरकँप झोपडपट्टी शिवाय किनारा दिव्यांनी
ओघळलेला CONTRAST हा असतोच कलावंत
आत्म्याचा गूढ साद आणि कलावंत असतोच
मिटलेल्या मुठीसारखा गुलदस्तात आणि गुलदस्त
सज्ज ठेवलेले सेक्युरिटीच्या टेबलावर आणि सेक्युरिटी
चमचेगिरीच्या जाजमावर, आंथरलेल्या

बंदिस्त तट. गट. आणि फाटाफूट
एकेकाची
सगळं अवघं असं.
सगळा बगीचा राखेचा. सगळा मोगरा.
फुलती पौर्णिमा
पण बॅरॅक. आत खोल निमुळती जात.
बाहेर हाका. कोलाहल.
फिल्मी संगीताच्या कोसळत्या लाटा.
सरोवर होत आणखी मरणप्राय.
मिटल्या डोळ्याचा नाही येत सांगता आराखडा
पण दुःख रहातंच एकमेकांचं एकमेकांजवळ.
विड्या. पत्ते. न झेपता भार.
वॉर्डर झोपतो, वॅाचमन जागा, वाचत पुस्तक.
मोठी मोठी साक्षरांसाठीची पुस्तकं झेलातली.
तो स्वतःशीच अनेकदा घोकतो बंदीचा आकडा.
किती येरझार स्वतःतच. दिवसभर थकलेले सगळे
स्वतःचीच स्वप्नं स्वतःला अनेकदा सांगून.
मग रात्री कशाला बघायची वाट.
सगळे पशुवत्. घनघोर घोरते.
स्तंभासारखे ताठ पहुडलेले
रात्र चादर. ही रात्र की बेरात्र.
हा चंद्र की जखमी आठवण.
हा पूर्ण गोल.
ही भरकटलेली थाळी.

हे फाटलेल्या वेसनसारखे दारिद्रय
अरुंद्या रात्रीत पसरलेले.
एकटा एक बसतो जागत
आणि वाचतो गिरबिट अक्षर.
लावतो जर्मन नि पटवतो स्वतःला
स्वप्नांची दुनिया न्यारी.
पण प्रत्येक स्वप्नालाही अस्तेच कुंपण
इथे कुंपण दारुड्याला जसे दारूचे
तसे नाविन्याला लाकडी तुरुंगाचे
ढालगज कडीचे नि अवघड कुलूपाचे.
पण कुलपं सगळी सारखीच
नि एकुलती एक बंडाची चावी.
माझ्या हाती, तुमच्या हाती.
हे एकमेव कठोर दुखणं आपलं
की आपल्याला नाही अजून जाणवत
नासलेलं रक्त.
नाही अजून पुरेसे झालो क्षुब्ध.
गिरबिट नाही उलगडत.
आफ्रिका नाही होत आपलं कढत रक्त

## २९

१ तुझी
सहजसहज
साध्य आठवण,
डोळे उघडल्यावर
बाहूंवर लगडलेली सगळी
शुभ्र फुलं

२ कितीदा
स्तब्धता
भरून सगळी ओसंडते.
मी घेतो बुडी
तुझी सगळीकडे घुमते
तू तुलाच घातलेली हाक

३ तेव्हा कधी
वळणावरून मागे पाहिले,
आठवते,
डोंगर, नदी किंवा पाऊलवाट
काहीही नव्हते.
कविता नव्हती.
बसस्टॉप होता रिकामा.
एटीसीक्स निघून गेलेली

४ मैदान ओलांडायचं
की सभोवार फिरायचं
चंद्र असेल उगवत

त्याला पडतात
का
साधेसाधे प्रश्न,
जसं प्रतीक्षा करायची
की आणि उदास व्हायचं.

५ एवढं आणखी एकवार पटवतो
मी मला
की सूर सूर असतात तुला
मी अनोळखी दिसतो
तसा
सूर दूर असतात.

६ लब्धप्रतिष्ठित नावांनी
नाही कोणी मला पुकारलं
नि तुलाही अनोळखी होती
दुसरी भाषा,
दुसरी नामाभिधानं
तू स्मशानाकडे बोट दाखवायचीस
नि म्हणायचीस
“ते बघ, स्मशान”

७ अपूर्ण.
पण कधी, कुठे, किती
आणखी परत
पूर्ण
तरी कसं

किती –
तुला पडायचे प्रश्न असे.
मी शोधली नाहीत उत्तरं
तुझा चेहरा न्याहाळला,
उदासी
की साधं डोळ्यातलं हासणं.
की माझ्या डोळ्यात
सांडलय तुझंही प्रतिबिंब ?

आधी सप्तक लिहिलं, पहिला हसा
आणि पुढे लिहिताच येईना.
दोन टोल झालेत. पहारा बदलून गेलाय
पण प्रत्येकजण टळटळीत जागा.
झोप म्हणजे लहानसा मृत्यू
वाटत असेलच प्रत्येकाला असे नाही,
पण प्रत्येकाजवळच नाही
त्याची स्वत:ची अशी भाषा
स्वत:चं दैनंदिन सांत्वन वगळता,
माझ्याकडचा पहिला हप्ताही कदाचित्
असेल भूतकाळातला परिपक्व क्षण
पण इथे मी आहे पूर्ण एकाकी,
इथे मी झोपेतून उठतो सकाळी
नि प्रत्येकदा मी उन्हावर प्रेम करतो
उन्हाला मी तू ती आपण काही म्हणतो.
उन्हाला मी सांगतो सगळ्या हकीकती

कधी व म्हणून सुरुवात करून
तर कधी तुझी सहजसहज साध्य आठवण.
तुम्हाला मी म्हणतो माझं परिपूर्ण आक्रंदन
रात्रीच्या अंधाऱ्या झोपेतून जागे झाल्यावरती.

[ व सुरुवातीला जो करतो
तो मृत्यूचा संदर्भ घेऊन सुरुवात करतो ]
स्वप्नांसोबतच वावरतो मृत्यूचा सार्थ संदर्भ
पण आपण झगडतो
स्वप्नांतही. पारदर्शक हातापायांच्या पार
जातो हा झगडा. अल्याड फक्त अप्रूप
ताणून ठेवलेले दु:खी स्वानुभव
आपण आपल्याला सांगायला सुरुवात करतो
नि काळाचा एक तुकडा धाडकन कोसळतो
रात्रीच्या अवजड मशिनमधून. वेळ
म्हणजे हा भावुक नाकर्तेपणाचा काळ सर्व
साग्रसंगीत आटोक्याचा. पण पल्याडच.
वेळेचा आपल्या समोरचा तुकडा कसं मॉडर्न शिल्प
दु:खाचं की घडवलेल्या प्लास्टिकमध्ये
आत झुकवून ठेवलेलं किरणव्यापी इन्द्रधनुष्य.
पण तेही न काही हातात माळता येणारे.
आपण जातो त्याचा अंदाज घ्यायला
आणि खाली ठेवलेली
कुंडी असते गच्च घाणीने भरलेली.
इथे संड.सावरही येते आकाश भरून
इथे पाण्यातही दिसतात थंड वारे.
पण सुरुवातीच्या आधीही असतं खुलं डेअरींग.

मी म्हणतो मला कित्येकदा
की माणसांच्या घोळक्यांत मी फिरलो मृत्यूची

कार्ड तपासत. त्याचे संदर्भ तपासत
येणाऱ्याजाणाऱ्याच्या चेहऱ्यावर.
तर मला दिसला होता रिल्के म्हणजे
निव्वळ खोबडी आणि सूर्याचा चेहरा खिडकी

मी आलो होतो धुळ्याहून मिसापूरपर्यंत
तर सगळी रानं होती निव्वळ नांगरलेली
त्यावर नव्हतं आकाशी दव, नव्हता प्रकाश

आता मी मोहरून आलेल्या ढगांकडे बघतो.
नि मला दिसतो
त्यांच्या कडेला ओळखीचा हिरवा गारवा.

विसापूर जेल

प्रिय,

पत्रावर दिनांक टाकायची, कशाला हे मी आता हळूहळू विसरून चाललो आहे. तरी पत्ता महत्त्वाचा असतो. तसा माझाही आहे. पण त्याने माझे महत्त्व मात्र वाढलेले नाही. अनुभवाच्या एका वेगळ्या कक्षेत, समाजाच्या एका वेगळ्या वर्गामध्ये मी पडलो आहे पण पाण्यात पडले की पोहायलाच पाहिजे हे मला पटत नाही. म्हणी खोटया असतात. एका म्हणीचा, एका कतीचा, एका द्रष्टयाचा परिपोष हा दुसऱ्यासाठी अगदी घादान्त असू शकतो.

मी सकाळी उठतो. रात्रीपर्यंत जागा रहातो. रात्री झोपतो. जेव्हा मी झोपलेलाच असतो. पण शरीराचं अंतर्गत यंत्र सुखरूप असलं तरी ते ठाकठीक असतं, होत जातं, जाईल असं मी छातीवर हात ठेवून म्हणू शकणार नाही. मी अनेकदा रात्री सुद्धा जागतो. दिवस-रात्र सगळं मिळून एक महान जागरण होऊ पहात आहे. काळाचा पांढरा झगझगीत धागा सरकताना दिसतो. पण त्याला मी हात लावू शकत नाही.

तू मला बाहेर असताना भेटला होतास. आपण चर्चा

करताना तू अकस्मात् थांबलेला मला आठवतंय
त्याच क्षणाला अकस्मात् मीही बोलायचा थांबणार होतो.
थांबलो आणि आपण एकदमच क्षुब्ध होऊन एकमेकांकडे
पहात राहिलो. तू ट्रॅजिक हसलास. तुझे शांतपणे मुडपलेले
ओठ तू तीव्रपणे चावलेस.

मला ठाऊक आहे आपण, आपली पिढी किती एकाकी
पडत चालली आहे. सततच्या अपयशाच्या जाणिवा,
सततचे असमाधान आणि नवीन काही करायची धडपड.
इतरांपासून आपणाला केवढी वेगाने नि संक्षेपाने
सिद्ध करत जातेय. आपण पुष्कळदा लोकांना अगदी
परके वाटतो ना?

पण खरोखरच हे लोक आपले असतात का?
पुष्कळदा आपल्या समोरचे प्रश्न हे लोकांचेच प्रश्न
असतात का? मला हे ठाऊक आहे की आपल्या
पिढीचा प्रश्न हा आपला नाही, तो समग्र समाजाचं
आपल्यावर पडलेलं विद्रूप चित्र दाखवतो. त्यासाठी
आपल्याला ठायी ठायी आस्थेचा आणि अभ्यासाचा
प्रचंड साठा वापरावा लागणार आहे.

का सगळे अनाठायी नाश पावत आहेत. का लोकांना
स्वतःला ओळखता येत नाही. का अमेरिकेसारखा
एकादा साम्राज्यवादी देश दूरस्थ मंगळावर जातो
आणि तिथेच गुन्हेगार ठरलेल्या काळ्या माणसांचे
मुडदे पाडले जातात. जार्ज जॅक्सन सारखा एकादा

क्रिमीनलसुद्धा हळूहळू राजकीय जाणीव प्राप्त करतो
खिन्नपणे आपल्या आईला काहीही कळत नाही
म्हणतो आणि तिला तू किडलेल्या समाजाची
प्रतिनिधी आहेस असं म्हणतो.

जॅक्सनचा खून झाला की केला गेला. काळ्यांची
चळवळ ही फक्त अमेरिकेत आहे, की दक्षिण
आफ्रिकेतला तिचा उद्रेक हा सर्व जागतिक
समाजाचं अवघड जागचं दुखणं असल्यासारखा खिळून
राहिला आहे.
आपल्या इथल्या दलितांच्या प्रश्नाने घेतलेले रूप तेव्हढेच
उग्र नव्हते का? वरळीला लष्करी कॅम्पचे रूप प्राप्त झाले
नव्हते का? आणि मग ती सगळी चळवळ ओसरत ओसरत
का गेली? यात कोणाचे अपयश होते? यशः सिद्धीसाठी
आपण अजून तयारच झालो नाहीत का? मार्क्सने
पोलीटिकल इकॉनॅमीच्या क्रिटीकमध्ये म्हटलेय "Mankind thus inevitably sets itself such tasks as it is able to solve."

मग आपल्याला अजून स्वतःला ओळखता येत
नाहीच हे खरे. जनतेच्या क्रांतीकारी चळवळीत आपण
नवीन चेतना निर्माण करू शकत नाहीय हेही खरे.

या प्रश्नांनी मी खरोखरच विद्ध झालोय. माझं रक्त
प्रचंड वेगाने उसळतं. मी वेडा होतो, वेड्यासारखे माझे
डोळे बघून माझे नंबरकरी विचित्र नजरेनं
माझ्याकडे बघतात.

मी एक साधा कार्यकर्ता, आपल्या जाणिवेच्या नि
कृतीच्या कक्षेत सगळं आणून त्याला वेगळं स्वरूप
देण्याचा प्रयत्न करू बघतोय.

माझ्या बाजूला जो माणूस झोपतो, झोपेत ' आ गयी,
आ गयी ' म्हणतो तो वॅगनफोड्या आहे. त्याच्या
पलीकडे एक शेतकरी. मध्ये मी.

मी कोण आहे याबद्दल मला शंका नाही. पण
मी सुद्धा मवाली, मटकेवाला, दरवडेखोर, स्मगलर,
बलात्कारी असेन म्हणून मला यांच्यात डांबलंय,
पण म्हणून मी सुद्धा उद्या यांचच एक फ्रँकेस्टाईनी
संमिश्रण होणार आहे का ?

माझं खच्चीकरण करायचं हा यातला प्रमुख
हेतू आहे. तुम्ही मरा, मरायचा तुमचा अधिकार
तुम्ही का बजावत नाही. असं रात्री वाजणारा टोल
मला अर्ध्या अर्ध्या तासाने विचारत जातो आणि
त्यातच पहारेदारांच्या जागते रहोच्या किंकाळ्या ऐकू
येतात. मी मनाशी म्हणतो जागते रहा आणि
हळूहळू मरा

पण मरणाच्या टोकाला आणखी एक खुनी माणूस
कायम रहात असतो. तो मरणाच्या रात्री दचकून
उठतो. आणि आपलं शस्त्र साफसूफ करतो.
त्याच्यासमोर केसभर अंतर चुकलं तरी मृत्यु उभा
असतो. त्याला फक्त एक आसरा रहातो, उग्र वार

करण्याचा. तो शिपय्या असतो. मृत्यू ही वास्तविक घटना, तिचं निदान आधी कोण करतो, आदला आणि शेवटचा दुधारी घाव कोण घालतो ते महत्त्वाचं.

आणि, आधीचं एक अख्खं युग दुसऱ्या युगाला मोठ्या खुनी वेगाने ढकलून देतं, तसं मला सगळं ढकलून द्यायचंच. हे मी कधीतरी विसरू शकेन का?

तुमच्या सर्वांचाच.

आणि जर हे सगळच असं असह्य होत गेलं
तर कसं आपण शकणार खवळलेल्या घोड्यासारखे खिंकाळू
तुफान वेगाने धावणाऱ्या. कसे शकणार
प्रलय पसरवणाऱ्या अग्नीची बरोबरी करू.
एकएक कणाकणाने वाढणारे अनोळखी मूल
नाही का आपल्यालाच दोषी धरणार
आणि जर आपण नाही तर कोण त्याची
धारातीर्थीची सखोल भविष्य घडविणारं ?
नाही का सगळी भाषा दौतीमध्ये अडकलेली
आणि आपल्या रक्तातली गंगा व्होलगा यांगत्से
तिच्यामध्ये असणार सगळ्याच मुडद्यांची रांग पसरलेली
आणि आपणच आपलं रक्तमांस तोडून तोडून खाणार
ऐकायच्याच तर स्वतःच्याच हाका, सोबत अश्रूंचे अर्थ
प्रयत्नपूर्वक कवटाळलेली साधीसुधी ध्येयं
हे आपणच ना ऐकणार आणि आपणच या
कोसळणाऱ्या अपघाताला भक्कम सावरून धरणार.
आई रडते, मुलं तिच्या मांडीवरून तिचे अश्रू पुसतात
तसे आपणच ना आपले रोडमोड हात उंचावणार ?

अ रेल्वेचं इंजिन धडधडत जाते
गोळी सूऽसू करीत
अतिविचारी जीव मुक्त होतो
त्याचं देणं संपलेलं अस्तंच
आधी.
डायोनियस लाओत्से गटे
म्हणजे सुंदर सुरी
तिची दुधार.
योकीयो मिशीमाचे आर्जव
साटोविरुद्ध जनतेला,
आणि टी. ई. लॉरेन्सचा गोरिला
आणि अर्नेस्टमधला शिकारी कुठे,
मायकोव्हस्की 'लेनिन' नंतरचा
तर येसेनिन इसाडोरा साडीचा
व्हॅनगॉगने शिंपडलेला अखेरचा
लाल रंग सगळ्या कॅनव्हासवर अप्रतिम
आणि मेर्लिनने सगळ्या सेक्सचीच
शीर तोडून टाकलेली

ब आणि कामूने गौरवलेय आत्महत्येच्या विविध सार्थ तऱ्हांना,
ह्यूम म्हणाला की प्रत्येकाला हक्क
जीवन संपवण्याचा
आणि आम्ही तरी काय वेगळे? उत्तुंग हिमालय
शुभ्र वहाती गंगा

अन्न परित्याग
थंड जोहार
जाणीव अशी घेरून टाकते सर्वांना बांधून
सर्वांना कोंडून तुरुंग जसा ठेवतो एकदम कोंडून,
कांट म्हणाला की आत्महत्या विरुद्ध आहे नैतिकतेच्या
आणि लेनिनला खरोखरच होता का वेळ,
होतं कधी हिमप्रपातासारखं अपयश
अनोळखी हिमालयातून वाहणारं,
होतं कधी न्होलगाचं पात्र लुभावीत
त्याला नि इतर अगणित क्रांतीकारकांना,
की जोहारचा माहीत होता अत्युत्कृष्ट पहिला क्षण
नि मग जोरदार घुसून थेटवर लढणं
सगळी अन्नाची संकटं सांभाळीत,
आणि माओ काय म्हणाला (खरोखर अगदी
कधीतरी तो म्हणाला होता का काही आत्महत्त्येबद्दल)

प्रत्येकाचं एक आपल्यापुरतं राष्ट्र :
एक करुणेनं भूषवलेला अश्रू सांडतो मातीत
आणि माती घेते त्याला शोषून,
तेव्हा त्याला रक्ताच्या कडांसारखे जे दु:खी कुंपण होतं ते
आणि प्रत्येकाच्या अंगावरल्या खुणा,
कधी पहाता येत नाही आपली पाठ,
आपला भूतकाळ आपलीच कणव टाळून.
एकेक बेट सांधावं,
एकेक बोट सांधून हातांचा रांगडा पंजा —
तसा इतिहासाचा दोरखंड सरकवून
पाहू या का आपणही आपल्या राष्ट्राची मर्यादा,
उल्लंघनाची आकस्मिक
थंड गोळ्याने तृप्त होता होता फुटण्याची रीत ?
मी म्हणतो हे तेव्हा मला दिसतो
एक बिडी चौथ्यांदा ओढणारा शेतकरी,
एक राष्ट्रवादी शेतकऱ्यांपर्यंत न पोचलेला.
एक काळाबाजारवाला दाणेदाणेपर नाम कोरवलेला
आणि एक नागवी बाई : जिला म्हणायची
सगळी धडपडती धावती चळवळ
उंचावलेला तिरंगा आकाशापार वर धरून भारतमाता,
भारतमाता की — — —, आणि आपली आई,
तिला नागवं बसवायला सगळेच झालो व्हतो आपण
कारणीभूत.
सगळे पांढरे, लाल, हिरवे

आणि ओघळून ठिबकणारे काळे फासिटी रंग.

मी एकाएकी उन्मळून का गेलोय,
मला या एकाच राष्ट्रात खंडोगणती राष्ट्रं
का दिसतायेत ? मला का दिसतीय स्पष्टपणे
विभागणारी रक्ताची आणि कष्टाची लालजर्द रेषा ?

एकेका माझ्या कृत्यावर डोळा वटारतो
एक नाकारून टाकलेला राजकीय जिनीयस,
एक मरणाशी झगडणारा रक्तपिती मजूर,
आणि एक स्वतःची हाडं गोळा करणारा शेतकरी.

५ भप्प
उन्हाच्या दिशा
मिट
लेल्या.

२ शीळ गाजते पांखराची :
पाखरू उपवाशी
त्याच्या डोळ्यातून काळोख
कोळसे —
त्याच्या स्वरातले
सगळ्या रात्रीवर विखुरलेले

३ मीही आता गाणं म्हणत होतो का
? मला माहीत नाही
· कोण सांगेल का
? पण इथं आणखी
कोण कोण
आहे
? नाही
?
कोण,
का मीही
नाही

४ क्षुब्धता : आशेचं आणि
निराशेचं संमिश्रण.

मीही एक कितवातरी क्षण.
पण वेगीज – वजाबाकी
ज्या क्षणी
त्या तेवढ्या अंतर्धानात.

५ आता मला माझे
सगळे आपलेसे केलेच पाहिजे.

६ भ्रमाचा पाव,
भूक सगळी शुध्दीवर असतानाची.
अंतर्विरोधाच्या कात्रीत
सापडलेला माणूस
स्वत:ला कापत नाही,
त्याचे बोट कापत नाही
तो कापतो
जाणिवेचे
प्रमाणशीर स्वत:पुरतंचं अस्तित्व.

७ आणि हे अस्तित्वही असतं
वारेमाप
आगळ्यावेगळ्यासगळ्या उलंघनाचं

हा दुसरा हप्ता. हाही आता लिहून झालाय
आता इथे नकोय मला रहायला.
बाहेरच्या लखलखीत दिवसरात्रीत
मी पक्का रुजून गेलो होतो.
आणि मी आत आलो तेव्हा आतही रुजलो;
मला हवंय जाणून घ्यायला कारणपरंपरेचं शास्त्र.
मी शिरतोय स्वत:त नि मिसळतोय सगळ्यात,

मी सगळ्यांत कच्चा दुवा पकडतो
आणि अख्खी साखळी तोडून टाकतो.
मी उदार झालोय सगळ्यावर.
मी दरवाजा सोडून बाहेर जाण्याचे सगळे रस्ते
माहीत करून घ्यायच्या प्रयत्नात असतो अहोरात्र.
मला माहीत झालंय सगळ्या कारणांच्या अगोदर
नसते. कुठलीही गोळाबेरीज मांडता येण्यासारखी
आणि आपण जेव्हा कधी सुरुवात करतो
तेव्हा विजयार्धे संपवून आपण कायमच घोडदौडत असतो.

आम्ही थंड झोपतो
ढोर महापुरुषांच्या पुतळ्याखाली
फेकून दिल्यासारखी. आणि माशांचा समुद्र वावरतो
आजूबाजूला. भंगत नाही त्याची स्थितप्रज्ञता,
भंगत नाही अवजडलेला पाया,
घोटलेला अन्यायी राज्ययंत्रासारखा. ते
राबवून राबवून मारतं न्यायाधिशाला
नि गुन्हेगारालाही एकाच तराजूत तोलून.
तसा महापुरुषाचा आत्मा नि
आमचा देह परमात्मा घडवतोय् हा समाज.
ढोरं मरतात वर्षभर,
ऋतू फिरतात महापुरुषाच्या त्वचेवर.
केवळ वावदूक भर फरकाने होतो
आम्ही त्याचा भाग नि तो आमचा.
काय केलंय या महाशयांनी,
काय केलंय आम्ही, आमच्यातल्या प्रत्येकाने
कोणी विणले होते मनःतरंग,
आणि फाशी दिलय कोणाला
तशातली झालीय सगळी गोष्ट
विसंगतिच्या या खाष्ट
अपप्रयोगातली, ज्या हिमतीने
बेजार केलं सर्वांना ती झालीय महाग,
बाजारात नाही मिळत उसना आवेश.
जो तो नशिबाचेच तारे तोडतो

आणि कुणी म्हणतो मी पहा महापराक्रमी.
सगळे नशिबाच्या दोऱ्यात ओवलेले,
सगळ्यांच्या अंतर्यामी एक सावध भोक
गुपचूप ठेवून दिलेले आकस्मिकतेची सोय
म्हणून
आणि सगळ्यांनी ओळखलेले स्वत:ला
कुणी हिणवायला नको काही कुणाला,
एक महापुरुष, एक मंत्री तसाच दुसरा
कुणी त्याच न्यायाने खडा संत्री
कुणी काळाबाजारवाला तर कुणी पांढरा बगळा
आणखी कुणी आणखी काही काही,
तर फक्त वरच्यांनी खालच्यांनाच काय दाबायचे
काय म्हणून कुणी रांडेने म्हणायचे
दहांदा चढा पण सवाष्णीन म्हणा म्हणून,
आणि ती बिचारी रांड तरी केवढी प्रामाणिक
तिला प्रमाण पुरतं पोटापुरत्या पैशांचं,
आणि त्या पलिकडचं अलवार जग नाही तिला मोहवत,
ती नाही होत, कधी भलत्या गोष्टींच्या मागे लागून
आम्हा कुजलेल्या ढोरांच्या खड्या बादशहासारखी
अवजड राज्ययंत्राच्या पुरभंगी पायावर
चढून, आकाशाकडे निमुळतं बोट दाखवून
स्वत:च्या मुर्दाडपणाची ग्वाही मिरवणारी राणी.

६१

मला केवढं आवडेल, झारीना
तुला एकटीला रडताना पाहून

तुझं प्रियदर्शन,
तुझे रेग्युलर सवयीचे विलग ओठ
आणि कधी डोंगरातली आदिवासी
तर कधी महाराष्ट्रीय सून,
कधी पायाखाली दडपून १० सिंह
११ त्यावर आरोहण्याची इच्छा करणारी
महिषासूरमर्दिनी,
प्रियदर्शिनी अशी पाहिलीयत
मी तुझी पानवाल्यापासून ते थेट
राष्ट्रपतिभवनापर्यंतची चित्रं.

तुझं नवल वाटतं मला
नवल की काळ्या भव्य पोषाखातसुद्धा
तू लोकांना कशी भूल घालू शकायचीस ?
कशी सौंदर्यशास्त्र शिकणाऱ्या पोरींपासून
ते मेनकेसारख्या घरंदाज बायांपर्यंत
तू तुझं चेटकी विद्रूप लपवून ठेवू शकायचीस ?

आणि तुझा केवढा दबदबा,
तू चालायला लागलीस की दडपायची छाती
भल्या भल्या आनुभविकांची

मी मान्य करतोच

की तुझा आहे प्रज्ञेचा अंधार.
पण मागचा पडदा देतो तुला साक्षात्कार,
मागचा गोंधळ उठवतो तुझी सिंफनी,
मागची सदिच्छा नि बळकट साखळी
देते तुझ्या हातात अनिवार्यता

तुझ्या ऐतिहासिक भूमिकेला आहे
तेवढाच मॅच्युअर परिसर,
तुला आहे सावरायच सारं पडतं
मशिन, सारं किडलेलं राज्य

झारीना, तुला नाही दोष देता येणार
एकटीला कारण तू स्वीकारलयस
या दुधखुळया नाटकात मूळ काम.

# सुप्रमेय्य

१

२२३६७
काव्य
२३५५
(स्थळ प्रत)

मी रात्रभर बडबडत बसायचो
सगळी हृदयं जवळपास एकसारखी
तरी त्यांच्या जागा किती विविध रक्ताळलेल्या.

प्रतिबिंब पडतात आरशात
आणि त्यांना अभिलाषा काळ्या मूळ प्रमेयाची.

केवढ्यातरी भुकेपोटी एक वर्ग राबतो, मरतो
त्याचा भ्रमनिरास होत नाही सहजासहजी
आणि तो मानतो विश्वव्यवस्था न्यायी,
आतनं परिपूर्ण असलेल्या संघर्षाचा
सोहळा व्यक्त करणारा दीर्घ आराखडा तो.
क्रांतीशास्त्राचं आकलन
त्याचं राह्यलेलं पारंपारिक
आणि कितीतरी महापुरुष लागतात मरायला
साधा एक जाणिवेचा पहिलाच थर विस्कटायला

आणि डोळ्यातली आसवं घळाघळा
म्हणजे स्फुलिंगाची उत्तुंग व्यक्त कळा.

आणि हात मी पुसणारे
म्हणजे त्याच्या एकंकार जाणिवेतले नामानिराळे.

आणि हात आतून अश्रूंची पिशवी
बलात्कारी खेचून काढणारे
म्हणजे त्याच्याच कर्तृत्वाचे सार्थ इशारे.

मी रात्रभर बडबडत असायचो
आणि ती पौर्णिमा अमावास्या काहीच नसायची.
रात्रीसारखा वटवटीत दिवस. दिवसासारखी
विभक्त रात्र.

बदलत्या आशेचे शिरजोर पवित्रे
रात्रभर त्या बंद सेलमध्ये मी टाकायचो,
मी रात्रभर स्वतःलाच क्रांतीशास्त्र सांगत पटवत असायचो

ही अखंड उलाढाल. ही सामुद्रधुनीच्या
आकाराची मंद हालचाल : कित्येक
वर्षाच्या काळानंतरचं परतीच उत्थान.
मी पहातो माझ्यासमोर जुनी नाती मोडकळलेली,
संघटनांना आतून छेदून काढणारा स्वार्थांध चाकू,
त्याची मोहक म्यान गंजून गेलेली
आणि हस्तेपरहस्ते तिला वागवणारा म्हणतोय स्पष्ट

त्याच्या विस्तारलेल्या वासना, त्याच्या शोषण नाड्या
विस्तारलेल्या बुभुक्षित जिथपर्यंत पोचल्यात
तिथपर्यंत नाचत तुडवून जनआकांक्षा टाकणारा
तो म्हणतोय, हा कोसळता, कोसळायला आलेला
कचकड्याचा परप्रकाशी सूर्य, आतून पोखरलेला
हा विपर्यासाचा स्पष्ट पुरावा, हे आंधळं बेट
हे लुटीला आमंत्रण देणारं उदार राज्य.

तो म्हणतोय, मी हिस्सा मागतो आणि
हा हिस्सा मला मिळालाच पाहिजे,
मी नागवं व्हायला सांगतोय म्हणजे व्हीनसने नागवं
व्हायलाच पाहिजे. तो म्हणतोय मी हात लावला की
कवितेच्या अर्थावरचं झिरझिरीत वस्त्र फिटायलाच हवं
आणि गुलाब नाहीत अजून उगवायला लागली देठापासून काळी
आणि पिकासोचं गुर्निका नाही झालं म्हातारं
आणि व्हिएतनामचे अश्रू नि रक्त अजून नुक्तेच
आहे उमलले.

५

१

होप स्ट्रीट, डाक विभाग क्रमांक १,
पिवळ्या भिंतीच्या मागे गराज
मधला रस्ता सोडून इराणी,
रस्त्यावर पारंब्या धरून ओणावलेला वड.

माझी मूळं रुजली होती तिथे एकदा फेब्रुवारीत
मी बसलेलो चिक्कार दोन तास

खुर्ची : पारंपारिक रूपक एकट्या येण्याजाण्याचं
इराण्याच्या चहात प्रतिक्षेचं मीठ असण्याचं

एक पांढरी फियाट काळी ॲम्बॅसडर
मोठ्या रस्त्यावर टॅक्स्यांच्या रांगा
कितीतरी माणसं ओलांडून गेली आली,
मी बसलेलो एकटा खुर्चीवर काही तास
खुर्चीच्या पारंपारिक रुपकाचा उपयोजित विध्वांस.

२ वॉरंट होतं पण धुळयाला नव्हतं जायचं तात्काळ,
डेक्कनवर रिक्शा थांबवून मग
स्टेशनवरती. गाडी गच्च.
रात्रभर उभा राहूनच मुंबई गाठली–
म्हणून मुंबई, जहांगीरजवळची,
लालबागची, शिवाजी पार्कची
नि मच्छरांनी रोंवावलेल्या ट्रान्झिट कॅम्पची.

मुंबई शांत होती. काही काळानंतर निवडणूका होणाऱ्या.
पण तेव्हा शांत. होपस्ट्रीटवर वकील दिसलेले,
ओळखू येणारे लेक्चरर्स कोपऱ्यावरच्या केळीवाल्याने
साली टाकलेल्या रस्त्यावर त्या दिसलेल्या
किणकिणत तीन वाजलेले आणि एक मोठ्ठा
घोळका बाहेर आलेला तो दिसलेला.

मुंबई शांत होती. खेडोपाडी कापणी संपलेली.
तिचं चित्र मी गराजच्या भिंतीवर आरेखलं
होपस्ट्रीटवर मी एक असमाधानाची ओंबी रोवलेली.

(तिचं भरार पीक होणार नव्हतं दोन तासात
पण मी बसून राहलेलो दोन तास. आणि
नंतर शांतता भंग नाही पावली. लोंढेच्या लोंढे
गेले निघून पण ओळखीचं एक माणूसही
नाही हासलं त्या विचित्र मुंबईत अग्रहक्क धरून.)

३ आणि नंतरच्याच दिवशी सगळी माणसं हासली मंदमधुर
रकानेच्या रकान्यांनी पेपर भरून गेलेले
एकही नव्हता हाताला लागत. टेबला टेबलावर सगळे
फिरस्तीवर. मी बसलो होतो खुर्चीवर तर तीही
पॉलिशने नवी चकाकी दिल्यागत पुरोगामी झालेली.

नवी निष्ठा, नवं जाज्वल्य झळकलेलं प्रत्येकाच्या मुखावर
भारतातील जणू दुसरी ऐतिहासिक घटना, सर्वांचे
अंतर्गत संबंध एक निर्णयाने बदलल्यागत झालेले.
आडाखेंच्या आडाखे. रकानेंच्या रकाने.

आणि एक अनुभवी म्हातारा देवदूत अवतरलेला,
त्याच्या स्वागतासाठी लोकांनी रांगा लावलेल्या
आश्वासनांखातर.

४ सगळ्यांच्या प्रतिक्षेला निर्णायक उत्तर नाही खुर्ची.
किंवा इराणीसुद्धा. मला तेव्हाही जाणवलं
खुर्चीच रूपक पारंपारिकता ओलांडणार नाहीय्.
इराण्याला नसतं कोणाचच कौतुक
इकडची खुर्ची तिकडे सरकवली
तिकडचा माणूस इकडे उठून आला.
त्याच्या लेखी असतो एक आंधळा स्वार्थ
की प्रत्येकानं जाताना गल्ल्यावर पे करावं.

५ मी पे करूनच होप स्ट्रीटवर उतरलो होतो का ?
पण तेही महत्त्वाचं नव्हतं खर तर
पालीची शेपटी गळून पडली म्हणून
खरोखरीचाच धरणीकंप होतो का हा प्रश्न
माझ्या समोरचा महत्त्वाचा वाटला होता मला.

आणि दोन्हीकडून परत एकदा भरती आल्यासारखी
आणि मधे नामुष्कीचं बेट अहेवपणे जोपासून
आपली सगळी शक्ती. उत्साहाची लाट
शहाद्याला नाही शिवत, नाही भिववत प्रचाराची लाळ.
इकडे आड, तिकडे विहीर. फक्त संदर्भाचं साह्य
सोडलं तर घटना रहाते मर्यादितच, एवढं
कधीपासूनच कळायला लागलंय शहाद्यातल्या सुजाणांना
कधीपासूनच, आधी दोनदाच्या निर्धारामुळे
आधी सगळं पाहून निष्कर्ष काढण्याच्या पद्धतीमुळे
आधी खालनं बांधत बांधत वर जाण्याच्या संवयीमुळे
सगळी निष्ठा एकात्म, हे
सगळ्यांना एकंदरीत सगळ्या पातळ्यांवरून जाणलेले.

शहादा काढतं उत्तर शोधून
आणि ते जोडून टाकतं दिर्घकालीन संघषाला.

हो. साधारणाला असतं वाईटाच्या संदर्भात मोल.
आणि अस्थिरतेला खोटया स्थिरतेच्या महत्त्वात,
आयाराम गयाराम ही मुलं नसतात नुसती झुंड
आणि खेळ असतो तेवढ्यापुरता जरी,
तरी त्याचं संबोधन उरतं काही काळनंतरही.

एक पाऊल टाकलं पुढे तरी पुरतं निमुळत्या नागमोडीत
जिथल्या तिथंच नुसतं उभं रहाण्यापेक्षा
आणि चालणं असतं चांगल उभं रहाण्यापेक्षा
पण धांवण्यापेक्षा चालणं चांगलं नव्हे.

(स्थळ प्रत)
REFBK-0022362
REFBK-0022362